31-05-2025-Dai-02_DH_PAN_28_04_2016-2.qxp 5/30/2025 11:39 PM Page 1



# खाण कंपनीमुळे शेती, जलस्त्रोताची वाताहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. ३० :** डिचोलीत तसेच लामगाव गावाच्या माथ्यावर कार्यरत असलेल्या खाण कंपनीमुळे गावातील शेती बागायती जलस्त्रोत व निसर्गाची कशा पद्धतीने वाताहात झाली आहे, याचे दर्शन घडविणारे पत्र लामगावातील एक सामाजिक कार्यकर्ता सचिन मयेकर यांनी डिचोली नगरपालिकेला सादर केल्यानंतर २९ रोजी सकाळी डिचोली नगरपालिका कार्यालयात नगरपालिका मंडळ, सेसा वेदांत खाण कंपनीचे अधिकारी, गोवा प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी यांची संयुक्त बैठक झाली.

## ▶ खाण कंपनीचा कारभार संदर्भात डिचोलीत बैठकीत नाराजीचा सूर

या बैठकीत वेदांत कंपनीतर्फे सुरू असलेला कारभार याचा संपूर्ण पर्दाफाश सचिन मयेकर यांनी स्वतः बैठकीत केला.

डिचोलीचे नगराध्यक्ष विजयकुमार नाटेकर, मुख्याधिकारी नेहाल तळवणेकर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या बैठकीत वेदांत खाण कंपनीकडून डिचोलीत सध्या सुरू असलेली खाण प्रक्रिया व खाण कंपनीकडून नगरपालिकेला व सामाजिक विषयांना न मिळणारे सहकार्य सचिन मयेकर व काही नगरसेवकांनी वाचला. या खाण कंपनीमुळे सुजलाम सुफलाम असा लामगाव कशा पद्धतीने उध्वस्त झालेला आहे व त्यास ही खाण कंपनी किती प्रमाणात जबाबदार आहे. याची संपूर्ण माहितीच सचिन मयेकर यांनी या बैठकीत सादर केली.



डिचोली : बैठकीस उपस्थित नगराध्यक्ष विजयकुमार नाटेकर, मुख्याधिकारी नेहाल तळवणेकर व इतर नगरसेवक.

लामगावच्या माथ्यावर असलेला खाणकंदक हा अत्यंत धोकादायक व असुरक्षित परिस्थितीत असून या खाणकंदकातील पाणी चार ते पाच मोठ्या क्षमतेचे पंप लावून वरच्या बाजूने वळविले आहे. हे पाणी लामगावात असलेल्या जलस्त्रोत खात्याच्या तलावामध्ये सोडले जाते. या पाण्यासह मोठ्या प्रमाणात खनिज मिश्रित माती या तलावात येते व तलावातून सदर पाणी थेट शेतात व मुख्य नाल्यातून खाली येते. हे पाणी कशा चोरीछुप्या पद्धतीने वळवून डिचोलीच्या मुख्य नाल्याला जोडण्यात आले आहे. असे सांगण्यात आले

या खाण कंपनीने लामगाव गावातील संपूर्ण शेती व पर्यावरण नष्ट करून गावाची मोठी हानी केली आहे. आपण या खाण उद्योगाविरोधात नसून न्यायालयाने सुचविलेल्या सर्वसमावेशक खाण प्रक्रियेला समर्थन देत आहे. जर सर्वसमावेशक पद्धतीने खाण प्रक्रिया करायची असल्यास खाण कंपनीकडून लामगावाचाही सर्व समावेशकपणे सांभाळ करण्याची जबाबदारी या कंपनीने घेतली पाहिजे. तेव्हाच सर्वसमावेशक अशी खाण प्रक्रिया होऊ शकते. असेही सचिन मयेकर यांनी यावेळी मांडले.

या बैठकीस खाच संचालनालय, गोवा प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनाही पाचारण करण्यात आले होते. प्रदूषण नियंत्रण मंडळाचे दोन अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. वेदांत कंपनीचे अधिकारी विवेक सांबरेकर व इतरांची उपस्थिती होती. तर खाण संचालनालयातर्फे कोणालाही या बैठकीत पाठविण्यात आले नव्हते, त्यामुळे उपस्थित नगरसेवकांनी नाराजी व्यक्त केली. बैठकीस उपनगराध्यक्ष दीपा पळ, नगरसेवक सुदन गोवेकर, अनिकेत चणेकर, नीलेश टोपले, ॲड. अपर्णा फोगेरी, ॲड. रंजना वायांगणकर, रियाज बेग, गुंजन कोरगावकर, सतीश गावकर यांची उपस्थिती होती.

### सेसा वेदांतकडून डिचोलीच्या विकासासाठी सहकार्य नाही : गावकर

डिचोलीत धेंपो कंपनी कार्यरत असताना नगरपालिका क्षेत्रातील अनेक विकास कामांना त्यांनी हातभार लावला होता. अनेक रस्ते, नाले, गटर यांना धेंपो कंपनीने आर्थिक पाठबळ देत या सर्व गोष्टी स्वतः बांधून घेतल्या होत्या. परंतु ज्या वर्षापासून सेसा वेदांत कंपनीने ही खाण आपल्या हाती घेतली, त्या वेळेपासून नगरपालिकेला विकासाच्या बाबतीत या कंपनीने कोणतेही सहकार्य केलेले नाही, डिचोली गावातून या खाण कंपनीकडून मोठ्या प्रमाणात महसूल गोळा केला जातो. परंतु त्याचा काहीच भाग डिचोलीसाठी दिला जात नाही. ही शोकांतिका आहे, माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक सतीश गावकर यांनी सांगितले.

### पावसाळ्यातील खबरदारी घेण्याची सूचना : नगराध्यक्ष

**हा विषय अत्यंत गंभीर असून खाण कंपनीने डिचोली व डिचोलीवासियांवर दुर्लक्ष करणे ही गंभीर बाब आहे. या विषयावर पुन्हा सविस्तर चर्चा करण्यात येणारच आहे. परंतु सध्या मोन्सूनला सुरुवात झाली असल्याने वेदांत खाण कंपनीकडून मोन्सूनच्या सज्जतेसाठी घ्यावयाच्या सुरक्षिततेबद्दल त्यांना सूचना देण्यात आली आहे. त्याप्रमाणे सर्व आवश्यक ठिकाणी लक्ष ठेवून उपाययोजना करण्याचे सांगण्यात आले आहे, नगराध्यक्ष विजयकुमार नाटेकर यांनी सांगितले.**


**NOTICE**

My Husband **Late Hemant Naik** was owning **Maruti Baleno Alpha Petrol Car** bearing **Reg. No. GA-06-D-2789.** After his death, I have applied to transfer the ownership into my name. Any member of the public, or any other Institution/ Bank objecting for such transfer, may send their objections along with documentary proof, to the **RTO, Vasco** or to me **within 15 days** time from today.

Date: 30.05.2025

Sd/-
**Harshada Hemant Naik**
**F No. 06, Anand Bhavan Appts, Fatima Colony, Dabolim, South Goa 403801**

Sandeep Ads

**CHANGE OF NAME**

I **RUHI RUDRESH NAIK** r/o E27 Radha bldg Panaji Tiswadi North Goa 403001 changed my name from **SAPNA VISHNU KASHALKAR** TO **RUHI RUDRESH NAIK.**
Hereafter in all my dealings and documents i will be known by the name **RUHI RUDRESH NAIK.**

**TRANSFER OF VEHICLE**

I **SMT SHALAN NARESH NAIK** wife of **LATE. NARESH SAGUN NAIK R/o, H. NO. 198, OPP SARASWATI DEVASTHAN , TISK, PONDA, GOA 403 401**would like to transfer the **(MARUTI WAGON R. Bearing Reg. No. GA-05-B 4138)** on my name. Any person having any claim or objection in this regards shall intimate to the **RTO, PONDA** within 15 days from the date of publication of the notice.

SD/- **SHALAN NARESH NAIK**

**CHANGE OF NAME**

I, **MILAGRINA DIAS,** R/o H.No. 297/11, **PRATAPNAGAR PILLIEM, DHARBANDORA GOA.** PIN NO. 403406have changed my name from **MILAGRINA DA SILVA** to **MILAGRINA DIAS** hereinafter in all my dealings and documents, I will be known as **MILAGRINA DIAS.**

Sd/-
**MILAGRINA DIAS**

**PUBLIC NOTICE**

This is to inform general public that Mr. Lavoo Govind Haldankar, R/o House No. 9/C/9, Dattawadi, Mapusa, Goa 403507 has taken housing loan for construction of residential house by mortgaging his property under Survey No. 53/6 of Village Verla, situated at Verla, Bardez, Goa, more particularly described in the Schedule.
The borrower has informed that Deed of Sale dated 21/06/1992 which is found registered with Sub-Registrar of Bardez vide Registration No. 1677, Book-I Document, Vol. No. 178 on 14/10/1992 pertaining to property under Survey No. 53/6 of Village Verla, which was executed between Julia Berta Dantas E Pinto as Vendor and Mrs. Promodini Ganpat Prabhu Alias Promhodini Ganpat Prabhu & Gaurish Prabhu has reported Lost/misplaced.
In respect of said loss the Missing Complaint is filed before Anjuna Police Station on 12/04/2025 under Missing Article Report No. 372/2025.
This present notice is given to inform general public that in case any of them finds the said title deed then same may be return to us at the address mentioned herein below.
Further the general public is inform that any person /s or entity having any objection towards mortgage, of the said property to us, such objection may be raised within period of SEVEN DAYS from the date of publication of present notice, failing which we shall assumed that there are no objection/s.

**SCHEDULE**

ALL THAT, immovable property known as "COLCON" totally admeasuring 225 sq. mts, situated within the limits of Village Panchayat of Verla, in the Village of Verla, Sub-District and Taluka of Bardez, District of North Goa, State of Goa, not registered with the Land Registration Office nor enrolled in the Taluka Revenue Office, and is surveyed under Survey No. 53/6 of village Verla of Bardez Taluka.
Mapusa, Goa, Dated: 30-05-2025

Sd/- **GP PARSIK SAHAKARI BANK LTD**
Branch Manager Mapusa Brach,
at Shop No.S-10, S-11 & S-12 Kavlekar Tower, Xim, Khorlim, Mapusa, Goa 403507


# धुमासे येथे कुळकार, स्थळकार मंदिराचा शिलान्यास कार्यक्रम

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. ३० :** डिचोली तालुक्यातील धुमासे येथील श्री सातेरी पुरमार पंचायतन देवस्थान अंतर्गत येणाऱ्या श्री कुळकार व स्थळकार मंदिराचा शिलान्यास कार्यक्रम अनेकांच्या उपस्थितीत उत्साहात पार पडला.

शीला व उदय यशवंत नाईक या



धुमासे : कुळकार व स्थळकार मंदिराच्या शिलान्यास कार्यक्रम पार पाडताना श्री. शीला व उदय नाईक, पुरोहित सुहास जोशी, भिसो नाईक, गोविंद नाईक, नारायण नाईक, न्हानू नाईक व मान्यवर.

दाम्पत्याच्या यजमानाखाली सुहास जोशी यांच्या पौरुहित्याखाली सदर मंदिराचा शिलान्यास कार्यक्रम पार पडला . या मंदिरास अंदाजे १५ ते १६ लाख रुपये खर्च येणार असून धुमासे महाजन, ग्रामस्थ, नातेवाईक व भाविकांच्या आर्थिक सहाय्यामुळे हे टुमदार मंदिर उभे राहणार आहे असे श्री सातेरी पुरमार देवस्थान समितीचे अध्यक्ष चेतन नाईक यांनी सांगितले.

या कार्यक्रमा वेळी एडवोकेट अर्जुन नाईक, ज्येष्ठ नागरिक गोविंद नाईक, शिवा नाईक, भिसो नाईक, लाडू नाईक नारायण गंगाराम नाईक तसेच देवस्थान समितीचे सचिव न्हानू नाईक, खजिनदार सद्गुरू नाईक , पदाधिकारी संदीप नाईक, नारायण गणेश नाईक , उमाकांत नाईक त्याचप्रमाणे उमेश नाईक, आनंद नाईक, रवींद्र नाईक, बाबाजी नाईक, उल्हास नाईक, दयानंद नाईक, रघुवीर नाईक आदी हजर होते. त्याचप्रमाणे मंदिर जीर्णोद्धार समिती पदाधिकारी उद्धव नाईक, अनिकेत नाईक, साहिल नाईक, श्रीराम नाईक, दिलीप नाईक, अमृत नाईक, सगुण नाईक, पुंडलिक नाईक, प्रीती नाईक, आर्वी नाईक, जानवी नाईक, रुक्मिणी नाईक, पुनम नाईक आधी उपस्थित होते.


**OFFICE OF THE CIVIL REGISTRAR CUM SUB REGISTRAR AND SPECIAL NOTARY IN THE JUDICIAL DIVISION OF BICHOLIM**

**Shri. Govindraj Narasinha Prabhu, Civil Registrar-cum-Sub-Registrar and Special Notary in the said Judicial Division.**

In accordance with the Section 346(11) of "The Goa Succession Special Notaries and Inventory Proceeding Act, 2012", it is hereby made public that by deed of Instrument of declaration of heirship drawn by and before me on 29th Day of the month of May, of the year Two thousand and Twenty Five at page 26 To 29 of Book No.327 of this office, the following is recorded: That on Twenty Eighth day of the month of July of the year Two Thousand and Twenty (28/07/2020) Shri. Satu Shanu Parab, expired at Community Health Centre, Bicholim-Goa, and who was permanent resident of Gaonkarwada, Bicholim Goa, without executing any will or gift or any other dispositions of his assets leaving behind his widow and half sharer/moiety holder Smt. Shanta Satu Parab, wife of late Shri. Satu Shanu Parab, age 60 years, retired, Indian National, residing at H.No.94, Gaonkarwada, Bicholim Goa, and his universal legal heirs his childrens namely (one) Shri. Saeesh Satu Parab married to Smt. Krupa K. Mandrekar alias Krupa Saeesh Parab and (Two) Shri. Prasad Satu Parab married to Smt. Priti Prakash Korgaonker alias Priti Prasad Parab.

And besides the above said legal heirs there is no other person or persons who as per law may have preference over them or who may concur along with them to the estate left by the said deceased persons.

Any person having any objections to this deed may file the same in this office within one month from the date of this publication.

SEAL

Bicholim Goa.
Date:29/05/2025.

Sd/- **(Shri. Govindraj Narasinha Prabhu)**
The Special Notary





रावण सत्तरी : कार्यक्रमात गायन करताना कलाकार

# रावण सत्तरीत 'सागरा प्राण तळमळला' कार्यक्रम रंगला !

■ टीम दैनिक हेराल्ड

**साखळी, दि. ३० :** वीर सावरकर युवा मंच, डिचोलीतर्फे श्री सातेरी केळबाय घाडवंश देवस्थान, रावण सत्तरी यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती निमित्त आयोजित केलेल्या स्वरा क्रिएशन प्रस्तूत व शैलेश शिरोडकर निर्मित स्वातंत्रवीर सावरकर यांच्या निवडक गाण्यांवर आधारित 'सागरा प्राण तळमळला' या मराठी गीतांच्या कार्यक्रमाने प्रेक्षकांची मने जिंकली.

या कार्यक्रमात कु.स्वरा शिरोडकर, प्राची गावस, सौम्या शिरोडकर व विजय शिरोडकर गायन यांनी गायन केले. यात त्यांनी जयोस्तुते जयोस्तुते श्री महन्मंगले ही स्वातंत्र्य वीर वि.दा. सावरकर यांनी स्वतंत्र्यदेवीची लिहिलेली आरती,मर्म बंधातली ठेव ही ' हे स्वातन्त्र्यवीर वि .दा.सावरकर लिखित 'सन्यस्त खड्ग' नाटकातील मराठी नाट्यगीत, हे हिंदूशक्ती संभूत दीप्तितम तेजा हे गीत व ने मजसी ने परत मातृभूमीला, सागरा, प्राण तळमळला हे गीत सादर केले. त्यांना हार्मोनियमवर शैलेश शिरोडकर,तबल्यावर दिगंबर वेळगेकर, टाळ साथ चंद्रकांत शिरोडकर यांनी केली. कार्यक्रमाचे निवेदन संजय गावकर यांनी केले.

# वाघुर्मे येथे कृषी विषयक कार्यशाळा

■ टीम दैनिक हेराल्ड

**सावईवेरे, दि. ३० :** विकसित कृषी संकल्प अभियान अंतर्गत वाघुर्मे येथे आयोजित कृषी विषयक कार्यशाळा झाली.

या कार्यशाळेला कृषी अधिकारी दिपाली नाईक, फळदेसाई, सरपंचा शोभा पेरणी, तसेच शेतकरी भानुदास प्रभू, ज्ञानेश्वर नाईक, प्रकाश वाघुर्मेकर, संतोष प्रभू, रमेश नाईक व स्वयंसहाय्य गटाच्या महिला उपस्थित होत्या.




वाघुर्मे : कृषी कार्यशाळेत उपस्थित दिपाली नाईक, शोभा पेरणी, शेतकरी व महिला.

याप्रसंगी दीपाली नाईक यांनी कृषी खात्याच्या शेतकऱ्यांसाठी असलेल्या विविध योजनांची माहिती दिली. येथील शेतकऱ्यांनी शेतीला प्राधान्य देत पडीक जमिनी सुपीक बनवाव्यात, असे आवाहन केले.

याप्रसंगी शोभा पेरणी म्हणाल्या की वाघुर्मे भागातील शेतकऱ्यांनी कृषी खात्याच्या योजनांचा लाभ घ्यावा व या भागातील पडीक जमिनी सुपीक बनविण्यासाठी पंचायतीतर्फे शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत केली जाईल, असे आश्वासन दिले. प्रास्ताविक व आभारप्रदर्शन सरपंचा शोभा पेरणी यांनी केले.

पान १ वरून

### १०० टक्के साक्षर : गोव्यात एकही अशिक्षित नाही !

या कार्यक्रमात गोव्यातील काही प्रतिष्ठित ब्रँड्सचा सन्मान करण्यात आला. या ब्रँड्सकडून पुढील पिढ्या परंपरा पुढे नेत असल्याचे मुख्यमंत्री सावंत यांनी कौतुकपूर्वक नमूद केले.
राज्य शिक्षण संशोधन व प्रशिक्षण परिषदेच्या संचालक मेघना शेटगावकर यांचा त्यांच्या शैक्षणिक योगदानाबद्दल सत्कार करण्यात आला. मुख्यमंत्री सावंत यांच्या हस्ते त्यांना स्मृतिचिन्ह प्रदान करण्यात आले.
प्रशासनातील सर्वोत्तम कार्यपद्धती अंगीकारणाऱ्या पाच शासकीय विभागांचा विशेष सन्मान करण्यात आला. तसेच तळेगाव (तिसवाडी, उत्तर गोवा) आणि बांदोरा (पोंडा, दक्षिण गोवा) या ग्रामपंचायतींचाही गौरव करण्यात आला. तळेगाव ग्रामपंचायतीचे स्वयंपूर्ण मित्र म्हणून वन विभागाचे मुख्य अभियंता श्री. दिलेश आनंद गावस देसाई यांना, तर बांदोडा ग्रामपंचायतीचे स्वयंपूर्ण मित्र म्हणून समाज कल्याण संचालनालयाचे सांख्यिकी अधिकारी श्री. थानू नारायण झल्मी यांना सन्मानित करण्यात आले.

# संरक्षण खरेदी प्रकल्पांना विलंब : आमर प्रीत सिंग

**नवी दिल्ली, दि. ३० :**

भारताच्या संरक्षण खरेदी प्रकल्पांना सातत्याने होणाऱ्या विलंबाबद्दल हवाईदलप्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी गुरुवारी एका जाहीर कार्यक्रमात संरक्षणमंत्र्यांच्या उपस्थितीत तीव्र चिंता व्यक्त केली. अनेकदा, आम्हाला करार करताना माहीत असते की, संबंधित प्रणाली कधीच येणार नाही. असा एकही प्रकल्प मला आठवत नाही जो वेळेवर पूर्ण झाला आहे. आपण असे आश्वासन का देतो, जे साध्य करता येत नाही?', या शब्दांत हवाई दलप्रमुखांनी आपली नाराजी व्यक्त केली.

भारतीय उद्योग महासंघाची (सीआयआय) वार्षिक व्यापार शिखर परिषद गुरुवारी नवी दिल्लीत झाली. या परिषदेत हवाई दलप्रमुख बोलत होते.

# 'दि गेरा'च्या विद्यार्थ्यांचे आयजीसीएसई परीक्षेत यश



■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. ३० :** गोव्याच्या अग्रगण्य आंतरराष्ट्रीय शाळांपैकी एक असलेल्या दि गेरा स्कूल ने २०२५ आयजीसीएसई परीक्षेत १००% उत्तीर्णता मिळवत भरीव यश मिळवले असून, शैक्षणिक उत्कृष्टतेचे केंद्र म्हणून स्वतःची ओळख अधोरेखित केली आहे.

या वर्षीचा आयजीसीएसई बॅच हा शाळेचा तिसरा आणि आतापर्यंतचा सर्वांत मोठा बॅच होता. एकूण २३ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली – जे मागील दोन वर्षांतील एकत्रित विद्यार्थ्यांपेक्षा अधिक आहेत.

– ICE पुरस्कार ऐच्छिक असतो. तो मिळवण्यासाठी विद्यार्थ्यांनी किमान सात विषय घेणे आवश्यक असते – यामध्ये दोन भाषा, गणित, विज्ञान, मानवी विज्ञान (Humanities), आणि एक सर्जनशील किंवा तांत्रिक विषय समाविष्ट असतो.

– तुलनेत, इतर राष्ट्रीय अभ्यासक्रमांमध्ये प्रमाणपत्रासाठी केवळ पाच विषय पुरेसे मानले जातात, त्यामुळे हा पुरस्कार मिळवणे ही विशेष बाब ठरते.

– २२ पैकी १७ विद्यार्थ्यांनी (७७%) ICE g§aMZoZwgma Distinction किंवा Merit मिळवले, जे शाळेच्या कठोर शैक्षणिक निकषांवरील कटिबद्धतेचे द्योतक आहे.

– विद्यार्थ्यांनी एकूण ६५ आणि ग्रेड मिळवले, तसेच ६३ इ ग्रेड मिळवले म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याने सरासरी पाचहून अधिक उच्च श्रेणीचे ग्रेड मिळवले.

बॅचमध्ये अव्वल स्थान मिळवणारी इलाहे श्रीनिवासन, जिने पाच, दोन आणि एक B मिळवले, म्हणाली, आमच्याकडे उत्कृष्ट शिक्षक होते, पण माझ्यावर विश्वास ठेवणे हीच खरी प्रेरणा ठरली. त्यामुळेच माझं लक्ष अधिक केंद्रित झाले. मला विषयात रस निर्माण करणं आणि सरधोपटपणे गोष्टी स्वीकारण्याऐवजी प्रश्न विचारणं हेच खरे अभ्यासाचे साधन वाटले – जे IGCSE अभ्यासक्रम प्रोत्साहन देतो. मी तासन् तास अभ्यास केला, पण ज्ञान मिळवण्याची भूक, माझ्यावर विश्वास ठेवणारे लोक, आणि प्रामाणिक प्रयत्न – ह्या सगळ्यांचा मिळूनच फरक पडला.

झारा बजाज, जिने दोन A आणि सहा A ग्रेड मिळवले, म्हणाली, माझे शिक्षक माझे आधारस्तंभ होते – त्यांनी नेहमी मार्गदर्शन केले आणि शक्य तेव्हा मदतीस धावून आले. त्यांच्या समर्पणामुळेच मी अभ्यासाकडे गंभीरपणे पाहिलं. माझा अभ्यास म्हणजे शाळेने दिलेल्या भक्कम पायावर सातत्याने केलेला प्रयत्न होता. प्रत्येक गोष्ट शाळेत अत्यंत काटेकोरपणे शिकवली आणि पुन्हा तपासली गेली. हे सर्वोत्तम अध्यापन, सातत्यपूर्ण परिश्रम आणि मजबूत आधारव्यवस्था यांचं मिश्रणच मला हे यश मिळवून देऊ शकले.


**Village Panchayat Ucassaim - Paliem - Punola Bardez - Goa**

Ref.No:- VP/UPP/Tender/2025-2026/ 248 | **TENDER NOTICE** | Date:- 30/05/2025

Sealed percentage rate tenders are invited from the eligible Registered P.W.D. contractors in appropriate class & category for the works mentioned below by the Sarpanch Village Panchayat, Ucassaim Paliem Punola.

| Sr. No. | Name of the work | Estimated amount put to tender excluding G.S.T in Rs. | EMD in Rs. | Time Limit in days (excluding monsoons) | Class of Contractor's Registration (new) | Cost of the tender form in Rs. | Category of Contractors |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1. | Cutting of bushes from ward no. I to ward no. VII within jurisdiction of V. P. Ucassaim Paliem Punola Bardez Goa (2025-26) | Rs. 228000.00 | Rs. 4560/- | 120 days | Class V & above | 4000/- | RBLD/ BLDGS |
| 2. | Desilting of drain from ward no. I to ward no. VII within jurisdiction of V. P. Ucassaim Paliem Punola Bardez Goa (2025-26) | Rs. 238112.74 | Rs. 4762/- | 120 days | Class V & above | 4000/- | RBLD/ BLDGS |

**TERMS AND CONDITIONS** **1.** Last date of receiving application is on **9/06/2025 upto 12.00 noon. 2.** Date of issue of blank tender form is on **10/06/2025 upto 12.30 pm 3.** Date of receipt of sealed tender is on **13/06/2025 upto 10.00 am** and will be opened on same day at **10.30 am. 4.** Application for issue of tender form shall be accompanied with **a)** Attested copy of valid registration certificate of the contractor in the concerned category of work. **b)** Attested copy of PAN card. **c)** Attested copy of valid GST registration certificate and acknowledgement of up to date return filed with ARN. (Application reference number generated on GST common portal) as per GST law. **e)** Declaration of the works in hand shall be submitted with detailed list indicating the present status, on Rs. 100/- stamp paper (however tender form will not be issued to the person who has works in hand more than four times the tendering limit). **f)** Attested copy of valid Income tax clearance certificate. **5.** EMD shall be in the form of Demand Draft/Deposit call receipt (DCR)/ Pay order from Nationalized or Scheduled bank drawn in favour of the Sarpanch, V.P Ucassaim Paliem Punola Payable at Ucassaim Paliem Punola sealed in a separate envelope. **6.** Contractor shall submit separate application for each work. Incomplete and third party application shall not be entertained by this Panchayat and no tender form shall be issued. **7.** Unsealed and conditional tender will be rejected outright. **8.** The contractor shall quote the tender excluding GST & GST as applicable shall be paid separately on total value of work executed. **9.** For the tenders/items of tender in case of being quoted abnormally below i.e 20.00 % below the estimated cost, than the contractor shall furnish on demand an additional performance security in the form of Bank guarantee from National/Scheduled Bank for that amount which is worked out as difference between quoted amount and reasonable amount reduced by 20.00%. **10.** Right to accept or reject any or all the tenders without assigning any reasons is reserved with the Village Panchayat.

Seal

Sd/-
( Anand Gadekar ) Acting Sarpanch V. P. Ucassaim Paliem Punola


# पेडणेतील सरकारी शाळा भर पावसात छत उघडेच

■ टीम दैनिक हेराल्ड

**पेडणे, दि. ३० :** पेडणे तालुक्यातील काही सरकारी शाळा छपरांची दुरुस्ती सरकारने हाती घेतलेले आहे. परंतु कंत्राटदराने काम करत असताना छप्पराची काळजी न घेतल्यामुळे पूर्ण शाळा उघड्या केल्यामुळे भर पाऊस शाळेत घुसला आहे. शाळेतील साहित्य ज्या इमारतीच्या भिंती आहेत. त्या भिंतीला पाणी लागलेले आहे. वीज वायरीनाही धोका निर्माण झाला आहे. भविष्यात शॉर्टसर्किट झाले आणि एखाद्या विद्यार्थ्यांला त्याचा त्रास झाला असेल तर त्याची जबाबदारी कोण घेणार?

पेडणे तालुक्यातील मोरजी, आगरवाडा, पेडणे गडेकर भाटले, वजरी या भागातील शाळांच्या दुरुस्तीची कामे कंत्राट दराने हाती घेत असतानाच पूर्ण छप्पर निकामी केलेले आहे. त्यामुळे अचानक



पडलेल्या पावसाने पूर्ण इमारत पावसाने भिजून काढलीच शिवाय इमारतीच्या भिंती तिथलं साहित्य आणि वीज कनेक्शन साठी पावसामुळे धोका संभवत आहे. यावर सरकारने लक्ष देऊन शाळा पुढच्या आठवड्यात सुरू होणार आहे. त्यामुळे या शाळेची स्थिती काय असेल? याची जबाबदारी कंत्राटदार घेणार आहे का?

यासंदर्भात पेडणें शिक्षणाधिकारी सौ. बागकर यांची भेट मिशन फॉर लोकलचे राजन कोरगावकर यांनी घेऊन त्यांच्याकडे या शाळेविषयी चर्चा केली. ज्या शाळा दुरुस्तीच्या नावाखाली पूर्णपणे उघड्या केलेल्या आहेत. त्या शाळांच्या भिंतीना विजेला आणि त्या शाळेमध्ये जी महत्त्वाची कागदपत्रे आहेत. त्या कागदपत्रानाही धोका संबोध असून त्याची जबाबदारी कोण घेणार आहे? असा सवाल राजन कोरगावकर यांनी अधिकाऱ्यांना केला. त्यावेळी तिने समाधानकारक उत्तर दिले नाही. भविष्यात ज्यावेळी शाळा सुरू होतील आणि त्यावेळी या शाळेच्या भिंती पाण्याने फुगलेल्या असेल वीज वायरी पाणी लागलेलं असेल, त्यातून जर एखाद्या वेळी विपरीत घटना घडली तर त्याला जबाबदार कोण? असा सवाल राजन कोरगावकर यांनी करून या सर्व शाळेंची मुख्यमंत्री डॉक्टर प्रमोद सावंत यांनी तातडीने अधिकाऱ्यांना सूचना करून पाहणी करून त्या शाळेल शाळा सुरू झाल्यानंतर धोका संभावणार नाही.

कंत्राटदाराच्या हलगर्जीपणामुळे या शाळेची दुरुस्ती करताना अचानक पाऊस पडल्यामुळे कंत्राटदारांची धावपळ उडालेली आहे. अगोदरच पूर्ण शाळांचे छप्पर निकामी केल्यामुळे पाऊस अचानक पडला त्यामुळे पावसाने शाळांमध्ये तलाव निर्माण केलेच .शिवाय शाळेच्या भिंती होत्या, त्या भिंती फुगवण्याचा कामही केले .काही शाळेचे दस्तावेज आहेत ,कागदपत्रे तीही पाण्याने कुजून जाण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. कंत्राटदाराच्या मनमानी कारभाराकडे पालक शिक्षक संघटनेने काही प्रमाणात लक्ष देण्याची गरज आहे .